मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
म.भा.म.न.पा./ज.प.
आवक क्र. ३६/ २०१९-२०
दिनांक:-१५ / १० /२०१९

# माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अर्ज

प्रति,

**मा. जन माहिती अधिकारी**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**
**नगर सचिव यांचे कार्यालय, तीसरा मजला,**
**मुख्य कार्यालय, भाईंदर (पश्चिम),**
**जिल्हा - ठाणे - ४०१ १०१.**

10रु. कोर्ट फी COURT FEE Rs.10 -9 OCT 2019 भारत INDIA दस रुपये TEN RUPEES

| | | | |
|---|---|---|---|
| **१)** | **अर्जदाराचे संपूर्ण नाव** | :- | **रोहित मो. सुवर्णा** |
| **२)** | **पत्ता** | :- | 'श्री' निवास, रेवा आगार, मनपा मराठी शाळेसमोर, (पुज्य साने गुरुजी भवन), उत्तन रोड, मुर्धा, भाईंदर (पश्चिम), जिल्हा - ठाणे - ४०१ १०१ **भ्र. - ९८६७४९८८१३** |

**३)** **हव्या असलेल्या माहितीचा तपशील**

**अ)** **संबंधित माहितीचा विषय :** माजी महापौर नरेंद्र एल. मेहता यांच्या पोलीस संरक्षण फी बाबत..

**ब)** **कोणत्या काळातील माहिती हवी आहे :** २८/०८/२००७ ते ०४/१०/२०१९

**क)** **माहितीचा तपशील :** नरेंद्र लालचंद मेहता हे महापौर या पदावर दिनांक २८/०८/२००७ ते २७/०२/२०१० पर्यंत होते. मा. वरिष्ठ पोलीस निरिक्षक, मिरा रोड पोलीस ठाणे यांनी दिनांक २१/०९/२००९ रोजी नरेंद्र एल. मेहता यांना पत्र पाठवुन **'भरपाई तत्वावर पुरविण्यात आलेल्या पोलीस संरक्षणाचे थकीत बिलाबाबत'** पत्र पाठवले होते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे प्रकरण २ नियम १ (के) अन्वये प्रस्ताव मा. महासभा दिनांक २०/११/२००९ रोजी चर्चेस येवून मिरा-भाईंदर महापालिकचे महापालिका निधीतून नियमबाहय निधीच्या वापराबाबत या प्रकरणावर ठराव क्र. ३१ सर्वानुमते पारीत व मंजूर झालेला आहे. त्यापुर्वी तत्कालिन मा. उप-आयुक्त (मुख्यालय) श्री. बालाजी खतगांवकर यांनी मा. आयुक्तांच्या मान्यतेने पत्र जा. क्र. मनपा/सा.प्र./७९/२००७ - ०८ दिनांक १६/०१/२००८ रोजी महापौर नरेंद्र मेहता यांना पत्र पाठवुन रूपये ३६,१२२/- (रूपये छत्तीस हजार एकशे बावीस मात्र) एवढी रक्कम मनपा फंडात भरावी व पोलीस बंदोबस्ताचा खर्च स्वता:हुन करण्यात यावा असे कळविले होते. महानगरपालिकेने दोन वेळा पोलीस संरक्षण फी पोलीस कार्यालय, मिरा रोड पोलीस ठाणे येथे जमा केलेली आहे.

पोलीस संरक्षण फी बाबत महानगरपालिका, पोलीस कार्यालय व नरेंद्र मेहता यांच्यामधील सर्व कागदपत्रे, पत्रव्यवहार, प्रस्ताव, टिप्पणी, नमुना क्र. २२ (ज्यावर तत्कालिन नगर सचिव हरेश लक्ष्मण पाटील, मुख्य लेखा परिक्षक, लेखाधिकारी, उपायुक्त (मुख्यालय) श्री. सुधीर एस. राऊत, पैसे घेणा-याची सही इ. अधिका-यांच्या स्वाक्षरी असलेल्या कागदपत्रे), पोलीस कार्यालय, मिरा रोड पोलीस ठाणे यांचे सर्व पत्र, स्मरणपत्र व दोन पावती इ., सदस्यांचे पत्र व प्रस्ताव, मनपा गोषवारा, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ प्रकरण २ नियम १(के) अन्वये मा. महासभेपुढे ठेवलेला प्रस्ताव, सर्वानुमते मंजुर झालेला ठराव क्र. ३१, तत्कालिन आयुक्त श्री. शिवमुर्ती नाईक यांचे पत्र क्र. मनपा/आयुक्त/३२७/२००९-१० दिनांक ०७/०१/२०१० रोजी नरेंद्र मेहता, महापौर यांना पत्र पाठवुन मनपाच्या फंडामधून त्यांच्या वैयक्तिक संरक्षणासाठी नेमलेल्या पोलीस संरक्षणाबाबत अदा केलेली फी रक्कम रु.५,२४,३९८/- (रुपये पाच लाख चोवीस हजार तीनशे अठ्ठयाणव मात्र) महापालिका फंडात जमा करणेबाबत कळविले होते इ. सर्व कागदपत्रे, प्रकरणामधिल संपूर्ण नस्तीचे सांक्षाकित दोन प्रत मला देण्यात यावी.

**नरेंद्र मेहता यांनी भारतीय जनता पार्टीच्या वतीने राज्य विधानसभा निवडणुका २०१९, १४५- मिरा भाईंदर विधानसभा मतदार संघातून नामनिर्देशन पत्र भरलेला आहे, दिनांक ०५/१०/२०१९ मी मा. निवडणुक निर्णय अधिकारी यांच्याकडे नरेंद्र मेहता यांच्या पोलीस संरक्षण फी थकबाकी बाबत माझे हरकत कलम ३६ (२) आर पी ॲक्ट, १९५१ अन्वये नोंदविलेले आहे. तरी मला न्यायालयीन कामकाजाकरिता संपुर्ण नस्ती मला तातडीने देण्यात यावी.**

**मी शासकीय शुल्क जमा करण्यास तयार आहे.**

**ड) कोणत्या माध्यमातून माहिती हवी आहे :** स्वत:

**टिप:** कागदपत्रे तयार झाल्याबरोबर मला माझ्या भ्रमणध्वनी क्र. ९८६७४९८८१३ यावर कळवावे.

**ठिकाण : भाईंदर (प.)**
**दिनांक : ०९/१०/२०१९**

[signature] 9/x/19

**रोहित मो. सुवर्णा**
अर्जदाराची सही/-

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ 36/2019 दिनांक :- 24 /10 /2019

प्रति,
श्री. रोहित सुवर्णा,
घर क्र. १४८८, श्री निवास,
नगरपालिका शाळेच्यासमोर,
उत्तन रोड, मुर्धा गाव
भाईंदर (प.)

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार २००५.
माजी महापौर नरेंद्र एल. मेहता यांच्या पोलीस संरक्षण फी बाबत.

संदर्भ :- आपणांकडील दि. ०९/१०/२०१९ रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज. (या कार्यालयास प्राप्त पत्र दि. १५/१०/२०१९).

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये, आपण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये श्री. नरेंद्र लालचंद मेहता हे महापौर पदावर असताना पोलीस संरक्षण घेतले होते सदर बिलाबाबतची कागदपत्रांसंबंधी माहिती अपेक्षिलेली आहे. सदर माहिती आपणांस जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ.35/2019 दि. 15/10/2019 अन्वये देण्यांत आलेली आहे.

कळावे.

(कैलास दा. म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी तथा लिपीक
मिरा भाईंदर महानगरपालिका
(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)

EM942391409IN IVR:6977942391409
SP BHAYANDER WEST S.O <401101>
Counter No:6,23/10/2019,11:28
To:ROHIT SUVWARNA ,BHY W
PIN:401101, Bhayander West S.O
From:MIRA BHAYANDER MAHANAGR,BHYW
Wt:15gms
Amt:17.70(Cash)Tax:2.70
<Track on www.indiapost.gov.in>
<Dial 1800 266 6868>

सदर अर्जदार यांना स्पीड पोस्टाद्वारे कळविण्यात आले. दि. 23/10/2019